03-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03-03-2025 00:04 Page 1



## निवडक

### शिमगोत्सव मंडळाचे अध्यक्ष गुरुदास नाटेकर

■ टीम दैनिक हेराल्ड



**म्हापसा, दि. २ :** येथील शिमगोत्सव मंडळाची बैठक नुकतीच म्हापसा नगरपालिकेच्या अध्यक्षांच्या कक्षात पार पडली. बैठकीला म्हापसा शिमगोत्सव मंडळाचे अध्यक्ष डॉ. गुरुदास नाटेकर, म्हापसा नगरपालिकेचे प्रभारी नगराध्यक्ष सुशांत हरमलकर, नगरसेवक साईनाथ राऊळ. सुधीर कांदोळकर, विराज फडके, आशीर्वाद खोर्जुवेकर, प्रिया मिशाळ, अन्वी कोरगावकर व मंडळाचे इतर पदाधिकारी मोठ्या संख्येनें उपस्थित होते.

या बैठकीत म्हापसा शहरात दि. १९ ते दि. २३ या कालावधीत शिगमोत्सव साजरा करण्याचे ठरविण्यात आले आहे. या वर्षी बुधवार दि. १९ रोजी रंगोत्सव हा उद्घाटन सोहळा होणार असून, त्यानंतर फॅन्सी ड्रेस (ब गट) व डान्स ऑन रेकॉर्ड स्पर्धा घेण्यात येणार आहेत. दि. २० ते २२ या कालावधीत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. २३ रोजी चित्ररथ, रोमटामेळ, लोकनृत्य व फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात येणार आहेत. यावेळी शिगमोत्सव शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यासाठी विविध उपसमित्यांची स्थापना करण्यात आली आहे. दि. १९ ते दि. २३ या कालावधीत साजरा होणाऱ्या कार्यक्रमांची रूपरेषा देण्यासाठी लवकरच विशेष पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे.

---

### उदरगत संस्थेतर्फे ८ रोजी मोरजीत महिला दिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २ :** उदरगत संस्थेतर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा होणार असून, त्यादिनी मोरजी फुटबॉल मैदानावर मांद्रे मतदारसंघातील महिलांसाठी खास क्रीडा दिन शनिवार दि. ८ रोजी सकाळी ९ ते संध्याकाळ ६ पर्यंत साजरा करण्यात येईल, अशी माहिती उदरगत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा आमदार जीत आरोलकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदाचा महिला दिन खास व वैविध्यपूर्ण स्पर्धा व कार्यक्रम आयोजित केले आहे. मतदारसंघातील महिलांना, अशी संधी देण्याचे कारण, घर, संसारात अडकलेल्या महिला भगिनींना विरंगुळा व महिला दिनाचे महत्व लक्षात येईल, अशी अपेक्षा आहे. लग्नापूर्वी मैदानी खेळ व अन्य खेळाची आवड होती मात्र लग्नानंतर त्यात खंड पडला. कुटुंबासाठी वेळ देणारी महिला स्वतःसाठी कधीच वेळ घेत नसते, त्यामुळे उदरगत संस्था असा अभिनव कार्यक्रम घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आयोजन समितीचे चेअरमन तथा आमदार जीत आरोलकर यांनी व्यक्त केले.

मांद्रेतील विविध शाळांतील मुलासाठी बालदीन साजरा करताना लहान मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य समाधान देणारे असते.त्याप्रमाणे महिला भगिनींच्या चेहऱ्यावरील हास्य व खंडित क्रीडा प्रकार अनुभवता येईल. या उपक्रमात सहभाग होऊन फुटबॉल, खो–खो, रेसरीले तसेच मनोरंजनाचे कार्यक्रम होईल. नऊ पंचायत क्षेत्रातील महिला गटात स्पर्धा व सर्वाधिक बक्षिसे पटकावणाऱ्या संघास चॅम्पियन चषक देण्यात येईल.

या दिनी विविध स्टॉल्स असतील तसेच एकदम नवीन अनुभव व उपक्रम, महिलात स्फूर्तिदायी व प्रेरक असल्याचे आमदार जीत आरोलकर यांनी सांगितले. यावेळी पालयेच्या माजी सरपंच तारिका तारी, करिष्मा ठाकूर, प्राची शेटगावकर,समीक्षा शेटगावकर व ज्योत्स्ना तिलवे आदींनी आमदार जीत आरोलकर यांचे अभिनंदन केले व महिला तसेच सर्व वर्गासाठी स्वयंरोजगार व अन्य योजनांचा लाभ दिल्याबद्दल आभारी असल्याचे मनोगतातून व्यक्त केले.

---

### बोरी येथे द्राविड ब्राह्मण संघातर्फे निवासी शिबिराचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**बोरी, दि. २ :** द्रविड ब्राह्मण संघ बोरी शाखेतर्फे प्रतिवर्षी घेतला जाणारा ब्रह्मचारी वर्ग यावर्षी दि. १३ एप्रिल ते ११ मे २०२५ या दिवसात सकाळी ८ ते संध्या ४ या वेळेत (अनिवासी) पद्धतीने होणार आहे.गोव्या बाहेरुन येणाऱ्या व दुरून येणाऱ्या मुलांसाठी निवासाची सोय केली जाईल.या वर्गात संध्या, देवपूजा, रुद्र, श्रीसूक्त, गणपति अथर्वशीर्ष अशा प्रकारचे विषय शिकवले जातील.वर्ग महेश कमलाकर बोरी यांच्या निवासस्थानी होणार आहे.

ज्या पालकांना ह्या वर्गाचा लाभ आपल्या मुलांसाठी करून घेण्याची इच्छा असेल त्यांनी दि. ३० मार्च पर्यंत नावनोंदणी करणे आवश्यक आहे. इच्छुक पालकांनी प्रवेश निश्चिती करण्यासाठी, वर्गाची नियमावली जाणून घेण्यासाठी आणि अधिक सविस्तर माहितीसाठी खालील क्रमांकावर त्वरित संपर्क साधावा. महेश कमलाकर गुरूजी – ९८२३९१६४६६, प्रदीप दामले –८८०६४५४२८३, घन:श्याम भट– ०८३२–२३३३३५५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# मालपे राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी खुला

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. २ :** पेडणे तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग ६६ मालपे ते न्हयबाग हा बायपास रस्ता सरकारमार्फत एम.व्ही.आर ही कंपनी तयार करत होती. या ठिकाणी बायपास रस्ता करत असताना डोंगर कट करताना श्लोप पद्धतीने झाले होते. त्यामुळे गेल्या वर्षी जून महिन्याच्या पहिल्याच पावसाळ्यात या रस्त्याची दरड कोसळली होती. त्यानंतर सरकारने दखल घेऊन दरड कोसळू नये म्हणून संरक्षण भिंत उभारण्यासाठी कामही सुरू केले. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे ही संरक्षण भिंत उभारल्यानंतर जून २०२४ साली या रस्त्यावरील च्या दोन्ही बाजूच्या दरडी कोसळून हा बायपास रस्ता पूर्ण वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. तब्बल आठ महिन्यानंतर हा रस्ता एकेरी मार्गासाठी खुला करण्यात आला आहे.

मालपे ते न्हय बाग पर्यंत जो बायपास रस्ता तयार करण्यात आला. त्या रस्त्यावरून पत्रा देवी पासून पेडणे येणाऱ्या वाहनास निर्बंध आहेत. मात्र पेडणे मार्गे पत्रादेवी जाण्यास मार्ग एकेरी खुला करण्यात आला. आठ महिन्याच्या कालावधीत कंत्राटदार रस्त्याचे काम कशा उत्कृष्ट पद्धतीने की निकृष्ट पद्धतीने झाले आहे. याचे उदाहरण आपल्याला या घटनास्थळी जाऊन पाहिल्यानंतर दिसून येईल. ज्या रस्त्याचे कंत्राट कंपनीला मिळालेले आहे. हा एम. व्ही.आर. कंपनी भाजप सरकारचा आवडता कंत्राटदार असल्यामुळे या कंत्राटदाराचे सर्व गुन्हे सरकारने पोटात घातले आहेत असे उदय महाले दावा करतात.

ज्या दिवसापासून राष्ट्रीय महामार्ग ६६ पत्रा देवी ते धारगळ महाकालीन पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण आणि बांधकाम करण्याचं काम या कंत्राटदाराने हाती घेतले. त्या दिवसापासून या रस्त्याचं काम धोकादायक स्थितीत बनत गेले अनेक ठिकाणी धोकादायक वळणे डोंगर कापतानाही अडचणी शिवाय ज्या ठिकाणी भूमिगत उड्डाणपूलांची गरज होती. त्याही ठिकाणी उड्डाणपूल उभारले गेले नाही. आतापर्यंत वीस पेक्षा जास्त मनुष्यांचे बळी या रस्त्यावरून गेलेले आहेत. आणि सरकार अजूनही या कंत्राटदारावर कसल्याच प्रकारची कारवाई करत नाही.

मालपे न्हयबाग बायपास रस्त्यावरची दरड जून महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात कोसळून पूर्ण रस्ता सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी कंत्राटदाराला तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करून रस्ता वाहतुकीसाठी खुला करावा, अशी सूचना केली होती. परंतु कंत्राटदाराने आपल्या मनमानी पद्धतीने या रस्त्याचे काम केल्याचे चित्र दिसून आले. आणि आठ महिन्यानंतर एकेरी मार्ग सुरू केल्याचे चित्र दिसून येते. त्याबद्दल वाहनचालक स्थानीक नागरिक नाराजी व्यक्त करताना दिसत आहे.

## ४जी प्रकल्पाला जमीनअभावी अडथळे

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ :** केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी ४जी प्रकल्पाला गोव्यात मोठा अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. मोबाइल टॉवर्स आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधांसाठी आवश्यक जमीन उपलब्ध नसल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीस विलंब होत आहे. सार्वजनिक विरोध आणि खाजगी जमीन मालकांकडून मोठ्या प्रमाणावर भाडेपट्टा आणि भरपाईच्या मागण्या यामुळे अडथळे निर्माण झाले आहेत अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

२०२२ मध्ये सुरू झालेल्या ४जी सॅच्युरेशन धोरणांतर्गत राज्यात मोबाइल टॉवर्ससाठी ६६ ठिकाणे निश्चित करण्यात आली होती. मात्र, यातील ५० टक्क्यांहून अधिक ठिकाणी जमीन उपलब्ध न झाल्याने प्रकल्प रखडला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बीएसएनएलला आतापर्यंत केवळ ३१ ठिकाणे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. उर्वरित ठिकाणी वनजमिनी, खाजगी जमिनी तसेच जनतेच्या विरोधामुळे प्रकल्प अद्याप पूर्णत्वास गेलेला नाही. दूरसंचार विभागाने सर्व राज्य सरकारांना ४जी सेवा प्रभावीपणे लागू करण्यासाठी सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, गोव्यात भाडेपट्ट्यावरील जमिनींवरील विवाद तसेच स्थानिक लोकांचा विरोध यामुळे प्रकल्पाच्या प्रगतीला ब्रेक लागला आहे.

सरकारने २६ खाजगी जमिनी भाडेपट्ट्यावर घेण्याचा किंवा संपादन करण्याचा प्रस्ताव दिला होता. मात्र, भूधारकांकडून मोठ्या प्रमाणावर भरपाई व भाडेपट्ट्याची मागणी केली जात आहे. काही जमिनींच्या मालकीसंदर्भातील वाद अजूनही न्यायप्रविष्ट असून, त्या पूर्वजांच्या नावावर असल्याने त्यांचे संपादन करणे कठीण झाले आहे. सरकारने अथवा बीएसएनएलने आतापर्यंत फक्त तीन ठिकाणी जमीन भाडेपट्ट्यावर घेतली आहे. मात्र, उर्वरित ठिकाणी हे शक्य होत नाही. महसूल सचिवांनी या प्रकरणी हस्तक्षेप करून राज्य अधिकाऱ्यांना बीएसएनएलसोबत संयुक्त सर्वेक्षण करून पायाभूत सुविधांसाठी आवश्यक शासकीय जमिनी ओळखण्याचे निर्देश दिले आहेत.

सर्वेक्षणादरम्यान १३ ठिकाणे निश्चित करण्यात आली होती, मात्र आठ ठिकाणी स्थानिक लोकांचा तीव्र विरोध असल्याने काम ठप्प झाले. सरकारी जमीन असूनही स्थानिक जनता प्रकल्पाला विरोध करत आहे,त्यामुळे सरकारने आता पोलिस संरक्षणाखाली काम करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाद्वारे भारतातील दुर्गम आणि मागास भागातील २५,हजार गावांना ४जी मोबाइल सेवा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. हा प्रकल्प युनिव्हर्सल सर्व्हिस ऑब्लिगेशन फंडाच्या माध्यमातून वित्तपुरवठा करण्यात येत असून, ५०० दिवसांत प्रकल्प पूर्ण करण्याचे केंद्र सरकारचे लक्ष्य आहे.

## एनईपी २०२३; तामिळनाडूतील हिंदीला विरोध कायम

**चेन्नई, दि. २ :**

भाषा ही संवादाचे महत्त्वपूर्ण साधन असली, तरी ती अनेकदा राजकीय वादाच्या केंद्रस्थानी असते. सध्या केंद्र सरकार आणि तामिळनाडू सरकार यांच्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी ) आणि हिंदीच्या मुद्द्यावरून संघर्ष निर्माण झाला आहे.

तामिळनाडू सरकारने नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्यास नकार दिला असून, त्याला हिंदी लादण्याचा प्रयत्न म्हणून पाहिले जात आहे. मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील डीएमके सरकारने स्पष्ट केले आहे की, राज्यातील शाळांमध्ये तामिळ आणि इंग्रजी यांचा समावेश असलेले दोन भाषांचे धोरण लागू आहे. मात्र, केंद्र सरकारच्या एनईपी अंतर्गत तीन भाषांचे धोरण आहे, ज्यामध्ये इतर भारतीय भाषांसह हिंदीचा समावेश होऊ शकतो. तामिळनाडू सरकारचा आरोप आहे की, हिंदी सक्ती करण्यासाठी केंद्र सरकार दबाव टाकत आहे. त्याचबरोबर, राज्य सरकारने एनईपी लागू न केल्यास केंद्राकडून शैक्षणिक निधी कपात होऊ शकते, असा इशारा देण्यात आल्याचेही समोर आले आहे. यामुळे हा मुद्दा केवळ भाषेपुरता मर्यादित न राहता उत्तर–दक्षिण राजकारणाच्या व्यापक संदर्भात पाहिला जात आहे.

तामिळनाडूतील हिंदीविरोधी भूमिका नवीन नाही. १९२८ मध्ये मोतीलाल नेहरूंनी हिंदीला सरकारी कामकाजाची भाषा बनवण्याचा प्रस्ताव दिला, तेव्हापासून तामिळ नेत्यांनी या निर्णयाला विरोध केला आहे. १९६८ मध्ये केंद्राने तीन भाषांच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला असता, तोही मोठ्या प्रमाणावर विरोधाला सामोरा गेला. तामिळनाडू सरकारने लोकसभा जागांच्या संभाव्य सीमांकनावरही चिंता व्यक्त केली आहे. जर लोकसंख्येच्या आधारावर लोकसभा जागांचे पुनर्रचना झाली, तर दक्षिण भारतातील राज्यांना फटका बसू शकतो, असे मुख्यमंत्री स्टॅलिन यांचे मत आहे. उत्तर भारतातील जास्त लोकसंख्येमुळे दक्षिणेच्या राज्यांना लोकसभेत कमी प्रतिनिधित्व मिळेल, असेही ते म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मात्र दक्षिण भारतीय राज्यांना सीमांकनामुळे कोणतेही नुकसान होणार नाही, असे आश्वासन दिले आहे.

राजकीय विश्लेषक मनीषा प्रियम यांच्या मते, भारतात भाषा हा केवळ संवादाचा विषय नसून सांस्कृतिक आणि राजकीय संघर्षाचा मुद्दा आहे. हिंदीशिवाय भोजपुरी, मैथिली यांसारख्या भाषांचे अस्तित्वही महत्त्वाचे आहे. माजी आयएएस अधिकारी आर. रंगराजन यांनी स्पष्ट केले की, संविधानानुसार हिंदी ही अधिकृत भाषा असली तरी, ती सक्तीने लादणे योग्य नाही. शिक्षणतज्ज्ञ डॉ. राजेश कुमार यांच्या मते, केवळ भाषा शिकण्याच्या राजकारणात अडकण्याऐवजी शिक्षणाच्या गुणवत्तेवर भर द्यायला हवा. आजही भारतातील अनेक विद्यार्थी आपल्या मातृभाषेतही नीट वाचू शकत नाहीत. त्यामुळे शिक्षणव्यवस्थेचा विकास हा खरा प्राधान्याचा विषय असायला हवा. तामिळनाडूतील हिंदीविरोध हा फक्त भाषिक नव्हे, तर राजकीय आणि सांस्कृतिक स्वायत्ततेचा मुद्दा आहे. सीमांकनासोबत जोडला गेल्याने हा वाद आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

## खुनाच्या आरोपातून तरुणाची निर्दोष मुक्तता

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ :** प्रत्यक्षदर्शींची अनुपस्थिती आणि खटल्यादरम्यान एका महत्त्वाच्या साक्षीदाराच्या मृत्यूमुळे, म्हापसा येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने खूनाच्या आरोपाऐवजी सदोष मनुष्यवधाचा आरोप ठेवलेल्या एका तरुणाची निर्दोष मुक्तता केली आहे.

खटल्याच्या तपशीलांनुसार, आरोपी श्यामसुंदर निषाद (२०) याने २५ मार्च २०१८ रोजी म्हापसा म्युनिसिपल मार्केटमध्ये जिलानी बेळगावकर यांना ढकलले. या घटनेत बेळगावकर जमिनीवर पडले, त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागला आणि नंतर गोवा मेडिकल कॉलेजमध्ये उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. यानंतर पोलिसांनी भादंवी कलम ३०४ अंतर्गत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करत निषादला अटक केली. मात्र, तीन महिन्यांनंतर त्याची जामिनावर सुटका करण्यात आली.

न्यायालयाने आपल्या निकालात नमूद केले की, पीडितेचा मुलगा आणि फिर्यादी पक्षाने सरकारी वकिलांच्या खटल्याला पाठिंबा दिला नाही. अतिरिक्त सत्र न्यायाधीश–२, म्हापसा राम सुब्राई प्रभु देसाई यांनी निरीक्षण नोंदवत म्हटले, फिर्यादीने जरी घटनेचे विवरण दिले असले तरी, आरोपीला दोषी ठरवण्यासाठी कोणतेही स्पष्ट पुरावे सादर केले नाहीत. तक्रारीतील मजकूर अफवा पसरवणारा वाटतो.

न्यायालयाने असेही निदर्शनास आणले की, फिर्यादी पक्षाने कोणत्याही प्रत्यक्षदर्शींची साक्ष घेतली नाही. आरोपीची ओळख पटवू शकणारे एकमेव साक्षीदार प्रेमकुमार कुंडईकर यांचे खटल्यादरम्यान निधन झाले. त्यांच्या साक्षीपूर्वीच सीआरपीसीच्या कलम १६४ अंतर्गत नोंदवण्यात आली होती, मात्र ती पुरेशी ठरणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

फिर्यादी पक्ष आरोपीला गुन्ह्याशी जोडणारे कोणतेही थेट किंवा परिस्थितीजन्य पुरावे सादर करण्यात अपयशी ठरले. अशा स्थितीत आरोपीला निर्दोष मुक्तता करणे अनिवार्य आहे, असे न्यायालयाने आदेशात नमूद केले.

### पालये ग्रामपंचायततर्फे युवकांसाठी क्षमतावृद्धी प्रशिक्षण कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २ :** स्वयंपूर्ण मित्र, ग्रामपंचायत पालये धीरज शामसुंदर परब व ग्रामपंचायत पालये यांच्या पुढाकाराने गावातील युवकांसाठी क्षमतावृद्धी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन रविवार दि. ९ रोजी श्री भूमिका वेताळ मंदिराच्या सभागृहात सकाळी ९ ते दुपारी २ या दरम्यान करण्यात आले आहे. हा उपक्रम युवकांना त्यांच्या कौशल्य आणि क्षमतेस वर्धित करण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे.

सहभागींना व्यक्तिमत्त्व विकास, संचार कौशल्ये, संघ व्यवस्थापन, आणि वेळ व्यवस्थापन या महत्त्वाच्या विषयांमध्ये प्रशिक्षण दिले जाईल.

## ‘बनावट कागदपत्रांद्वारे केली जाणारी विवाह, इतर नोंदणी रोखा’

### दक्षिण गोवा वकील संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी : एनआरआय आयुक्त अॅड. सावईकर यांच्या उपस्थितीत दिले निवेदन

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २ :** दक्षिण गोवा वकील संघटनेच्या व्यवस्थापकीय समितीने एनआरआय आयुक्त अॅड. नरेंद्र सावईकर यांना सोबत घेऊन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची भेट घेऊन मडगावातील उपनिबंधक (सब–रजिस्ट्रार) कार्यालयात बनावट कागदपत्रे, दस्ताऐवज लावून केली जाणारी विवाह नोंदणी व इतर नोंदण्या रोखण्याबरोबरच यासंदर्भात सखोल चौकशी करण्याची मागणी केली. यासंदर्भात दक्षिण गोवा वकील संघटनेने मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना निवेदन ही देण्यात आले.



**मडगाव : दक्षिण गोवा वकील संघटनेचे अध्यक्ष अॅड. प्रसाद नाईक, अॅड. किव पायस, अॅड. रोहीत शिरोडकर, अॅड. मारीया डिकॉस्ता व एनआरआय आयुक्त अॅड. नरेंद्र सावईकर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना निवेदन देताना.**

यावेळी दक्षिण गोवा वकील संघटनेचे अध्यक्ष अॅड. प्रसाद नाईक, अॅड. किव पायस, अॅड. रोहीत शिरोडकर, अॅड. मारीया डिकॉस्ता व एनआरआय आयुक्त अॅड. नरेंद्र सावईकर उपस्थित होते. दक्षिण गोवा वकील संघटनेतर्फे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बनावट रहिवासी दाखले लावून विवाह नोंदणी केली जात असल्याचे कित्येक प्रकार मडगाव उपनिबंधक कार्यालयात उघडकीस आले आहेत. त्यामुळे विवाह नोंदणीच्या एकूण प्रक्रियेच्या अखंडतेलाच बाधा येऊ लागली आहे. हे बनावट रहिवासी दाखले, इतर दाखले दलाल, एजंटांकडून दिले जात असून, काही वेळा हे दलाल आपण वकील असल्याचे भासवून बनावट दाखले देण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे वकिलांच्या प्रतिष्ठेला ही धक्का बसत आहे. हेच बनावट दाखले नंतर विविध सरकारी कार्यालयात महत्त्वाचे पुरावे व दस्तऐवज म्हणून सादर केले जात आहेत व त्याद्वारे रहिवासी दाखले, विवाह नोंदणी, नाव बदलणे, विक्री खत (सेल डिड्स) तयार करण्यासाठी वापरले जात आहेत. हे असले बनावट व फसवणुकीचे प्रकार त्वरीत मोडून काढणे गरजेचे असून, हे प्रकार त्वरीत न थांबवल्यास एकूण कार्यपद्धतीवरील विश्वासच उडून जाणार आहे.हे असले बनावट प्रकार रोखण्यासाठी सरकारने इलेक्ट्रॉनिक कार्यपद्धती तयार करणे गरजेचे असून, जेणेकरून दस्तऐवज, कागदपत्रांची पडताळणी करणे शक्य होणार असल्याचे वकील संघटनेने सरकारला सुचवले आहे. अॅड. नरेंद्र सावईकर यांनी सुचवले की, विवाह नोंदणी अर्जावर अर्जदार व घोषकाचे ही छायाचित्र लावल्यास विवाहीत जोडप्याची ओळख पटवणे शक्य होणार आहे. या प्रकारात सरकार लक्ष घालणार असून, वकील संघटनेने पुढे आणलेल्या या प्रकारात लक्ष घालून आवश्यक तोडगा काढण्याचे दिशानिर्देश राज्य निबंधकाला दिले जाणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दक्षिण गोवा वकील संघटनेला दिले असल्याची माहिती अध्यक्ष ड. प्रसाद नाईक यांनी दिली


**We Are Hiring In GOA!!!** ISPRAVA | LOHONO Stays | the chapter.

**Walk-in Interview at Isprava Group on 4th to 6th Mar 25.**

**Isprava** is the Largest And Fastest growing luxury holiday home developer in India, A typical Isprava home is designed by leading International designers.
**Lohono Stays by Isprava** has been created to craft contemporary, luxury vacatios for disceming travelers which offers high-end luxury homestays across holiday destinations, in India and South-East Asia, among top 5 in Asia in its category.

**We are the Company backed by Nadir Godrej and Ajay Piramal.**

**Isprava (Real Estate)**

- **FINISHING ENGINEER** : Diploma /BE Civil - 5+ years exp in Finishing.
- **LOGISTIC EXECUTIVE** : Diploma/Degree, 3+ years exp in logistics (Preferably in Civil)
- **PROJECT MANAGER** : BE Civil+ PMP, 8+ years of exp in Residential or Commercial Real Estate.
- **VENDOR DEVELOPMENT EXECUTIVE** : Diploma / BE Civil – 3+ years of exp in procurement/vendor development. (Civil & Finishing material)
- **MANAGER LAND & PERMISSION** : 8 - 15 years exp, Land sourcing, Buying, Liaison, Permission
- **VENDOR DEVELOPMENT MANAGER (Mumbai / Goa)** : Bachelor's degree in [relevant field], 5-7 years experience in vendor management (Contracts & Procurement), explore Goa market contractors.
- **ASSISTANT MANAGER BILLING** : BE / Btech in Civil Engineering. 5+ years of experience in billing. Knowledge of estimation & costing.
- **SITE ENGINEER MEP** : 3- 5 years exp, Dip / BE, Electrical or Mechanical
- **DESIGN MANAGER MEP** : 6 – 10 years, BE Electrical or Mechanical.

**Lohono Stays (Hospitality)**

- **GUEST RELATION EXECUTIVE/CONCIERGE/RECEPTIONIST (Membership Relation)** : Hospitality Graduate/ Diploma with 2+ years exp in Guest Relation, Front Office in Hotels or Resorts in 4/5* set-up
- **CHIEF EXECUTIVE/MANAGER MAINTENANCE/ EXECUTIVE MAINTENANCE** : 5 - 15 years exp in Hotel/resorts or villa maintenance
- **HOUSEKEEPING SUPERVISOR** : Hospitality Graduate/ Diploma with 3 + years exp in Housekeeping Activities in 4/5* set-up
- **COMMI 1/2/3** : 2 + years of exp in Preparation of Multi Cuisine.
- **SECURITY EXECUTIVE** : Graduate in Any discipline with 2+ years exp in Handling Multiple Security Sites
- **MULTI SKILL TECHNICIAN/CCTV EXECUTIVE** : ITI /Diploma holder with 2-10 years experience as MST or CCTV installation
- **VILLA ASSOCIATE** : 1-3 years exp in Housekeeping
- **GYM TRAINER/ INSTRUCTOR** : 2 years + experience in reputed GYM as a trainer

- **MULTIPLE JOB OPPORTUNITIES ENGINEERS : Real Estate/ Villa's (5 to 10 yrs), Civil, Mech, Electrical, MEP**

Venue: **ISPRAVA VESTA PRIVATE LIMITED,**
Mattawada, Pilimbi Vaddo, Sodiem Road Duler - Mapusa,
Cunchelim Bardez, Guirim, North Goa - 403517
Timing : **10.00 AM to 4.00 PM**
You are unable to open the QR code, Kindly share your Resume on the given number - **7304986813** or **akash.ravirala@lohono.com.**